=====================================================

## प्रकरण १ रे

=====================================================

=====================================================

## मिरज संस्थानातील रयतेची साराबंदीची चळवळ

=====================================================

## प्रकरण तिसरे

### मिरज संस्थानातील रयतेची साराबंदीची चळवळ

मिरज संस्थानातील रयतेने सारावाढी संबंधी जो सत्याग्रह लढा दिला त्यामुळे हिंदुस्थानातील सर्व लढयामध्ये त्याचा उल्लेख हा "छोटी बार्डोली" असा करण्यात येतो. मिरज संस्थानच्या राजेसाहेबानी सारा वाढ जाहीर करताच मिरज संस्थानातील रयतेनी सनदशीर, कायदेशीर व न्यायीकपणे चळवळ उभी केली. रयतेनी हया चळवळीमध्ये सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब केला म्हणून ती सर्व हिंदुस्थानभर "रयतेची सत्याग्रहाची चळवळ" म्हणून प्रसिध्द झाली होती. ही चळवळ स्वयंनिर्णय व आत्मविश्वासावर रयतेनी उभी केली गेली होती. त्यामुळे त्याचा फायदा सारावाढ जी राजेसाहेबानी केली होती ती कमी होण्यामध्ये झाला. अशारितीने मिरज संस्थानातील रयतेने स्वत:च्या संघटित सामर्थ्यावर सारांबंदीची चळवळ उभी करुन सारा वाढ कमी करुन घेतला होता.

मिरज संस्थानात प्रथम सर्व्हे सन १८६७ ते १८६८ साली झाला होता. हया सर्व्हेप्रमाणे सुरवातीस काही प्रमाणात सारा वाढ जाहीर होती. मिरज संस्थानातील लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतेने १८८१ साली प्रथम सर्व्हेनुसार जी सारा वाढ केली ती असह्य स्वरुपाची आहे म्हणून पॉलिटिकल एजंटकडे तक्रारी अर्ज करुन आपले म्हणाने कळविले होते. या तक्रारी अर्जामध्ये पूर्वी या तालुक्यास वाढी स्वरुपाचा सारा आकार लागु केला नव्हता. तसेच परिस्थितीमध्ये काही फरक पडल्यास शेतसा-यामध्ये सूट दिली जाईल अशी तरतुद पूर्वीच्या फसली १२७६ साली झालेल्या सर्व्हे मध्ये केलेली होती हे रयतेनी तक्रारी अर्जाद्वारे आपले म्हणाने कळविले होते.

१२७७ च्या फसली सालामध्ये शेतसारा आकारणी कापसाचे पीक अधिक प्रमाणात झाल्याने करण्यात आला होता. त्यावेळी मेहेरबान सर्व्हे कमिशनरसाहेब श्री बहादूर यानी १० वर्षे हा ठराव अंमलात राहील असे कळविले. या प्रकारे वाढिव सारा आकारणी ही थोड्या कालावधीची असून त्या संबंधी पुढे श्रीमंत कै. तात्यासाहेब पटवर्धन यांना लवकरच मुख्यत्यारी मिळणार असल्याने ते विचार करतील असे म्हटल्याने रयतेने वाढीव शेतसारा भरला. श्रीमंताकडे मुख्यत्यारी आल्यानंतर वाढीव शेतसारा आकारणीबद्दलच्या तक्रारी संबंधी चौकशी करण्याचा हुकूम मामलेदाराकडे दिला होता. परंतु हे काम पूर्ण होण्यापूर्वीच श्रीमंत राजेसाहेबाचे निधन झाल्याने या तक्रारी अर्जाचा काहीच उपयोग झाला नाही. त्यामुळे तो व वाढीव शेतसारा कायम राहिला.

अलिकडे १२८६ च्या फसली सालामध्ये दुष्काळ पडल्यामुळे आमची घरची मालमत्ता व जनावरे ही नाहीशी झाली. शिवाय आर्थिक पत ही नाहीशी झाली. ही सर्व परिस्थिती सरकारच्या नजरेस आणाली होती व त्याकरिता सरकारकडून बराच खर्च ही झाला होता. त्यासाठी प्रजेने अर्ज केला व त्या अर्जात प्रजेने असे म्हटले होते की,

"आमची स्थिती इतकी वाईट होण्याचे कारण म्हणजे, जे शेतसारा आकार निश्चित केला तो आजूबाजूच्या पेक्षा तिप्पट व जो दुसरा अलीकडे वाढीव शेतसारा जाहीर झाला तो दुप्पटपणे आकारलेला होता. आजच्या स्थितीत आम्ही अगदी नादार झालो आहे, पर्जन्यमान वेळेवर झाले नसल्यामुळे जमिनीतील पिके यावी तशी आली नाहीत, जी पिके आली ती शेतसारा आकार भरण्यास खर्ची झाली.

त्यामुळे आमच्या निर्वाहास काहीच शिल्लक राहिले नाही. सावकार लोकांनीही मागील देणे बाकी असल्याने नवीन पैसा कर्ज म्हणून दिला नाही. आता आमची एवढीच मागणी आपणाकडे आहे की, आजुबाजूच्या इलाख्यातील शेतसारा आकारणीचा विचार करून शेतसारा निश्चित करावा. अन्यथा आम्ही या शेतसारा आकरणीच्या संकटात सापडून आम्हांस जिवनास मुकावे लागेल असा प्रसंग आमच्यावर आला आहे तेव्हा यावर दया नजरेने आमच्या बचावाबद्दल हे मागणे म्हणून वरील प्रकारचा अर्ज दाखल करीत आहोत."

वरील प्रकारच्या अर्जावर अनेक शेतकऱ्यांच्या सह्या होऊन तो अर्ज दिनांक १६ ऑक्टोबर १८८१ साली पॉलिटिकल एजंट यांच्याकडे सादर केला होता.[१] वरील अर्जाची दखल त्यांच्याकडून झाली नाही तरी लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतेने आपली तक्रार नोंदवून वाढीव शेतसारा आकारणीबद्दलचे आपले म्हणणे सनदशीरपणे मांडलेले होते.

मिरज संस्थानामध्ये सारावाढ ही पुर्वी जरी झालेली होती तरी संस्थानातील परिस्थितीमध्ये काही फरक पडलेला नव्हता. शिक्षणाचा प्रसार फारसा झाला नव्हता, मुद्रण स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, संमेलने स्वातंत्र्यवरील बंधने होती, संस्थानामध्ये समतेचा अभाव होता. अशा प्रकारची मिरज संस्थानातील रयतेची शोचनीयस्थिती असताना श्रीमंतानी सन १९२७ मध्ये शेतसारा आकारणीमध्ये वाढ करण्याकरिता सरकारकडे मागणी करून श्री. मोळक डीएएल. यांची त्यासाठी नियुक्ती

केली. श्री. मोडक डी.एस्. यांना मदत करण्याकरिता दरबारतर्फे श्री.रामभाऊ पोतनीस (ढवळी) पाठविले होते.

मिरज संस्थानात जवळजवळ ६० वर्षे सर्व्हे केला नसल्यामुळे सारा वाढ केली नव्हती म्हणून श्रीमंतानी श्री.मोडक डी.एस्. लन्ड रेकार्ड सुपरिन्टेन्ड, पुणे याच्या नियुक्तीनुसार मिरज संस्थानात रिव्हिजन सर्व्हेचे काम सुरु केले. यावेळी मिरज संस्थान प्रजा-परिषदेच्यावतीने, श्रीमंतानी अनेकवार दिलेल्या आश्वासनानुसार सारावाढ आपल्या हयातील करणार नाहीत म्हणून दुर्लक्ष केले होते. जरी कदाचित सारा वाढ झाली तरी ती फारशी होणार नाही. असे गृहीत धरले होते. मिरज संस्थान प्रजापरिषदेच्या तिसऱ्या अधि-वेशनात १९२७ सालामध्ये मंजूर केलेल्या ११व्या ठरावानुसार अशी मागणी केली की, "सध्या मिरज संस्थानात रिव्हिजन सर्व्हे चालू आहे, त्यामुळे शेतसारा वाढण्याचा संभव आहे परंतु सध्याच्या खालावलेल्या परिस्थितीत शेतसारा वाढ होवू नये अशी मिरज संस्थान रयतेची मागणी आहे. तिचा अव्हेर श्रीमंतानी करु नये व ही वाढ न करण्याचे अभिवचन वारंवार दिले आहे ते खरे करुन दाखवावे. अशी या परिषदेची विनती आहे.[२] या प्रमाणे श्रीमंत राजेसाहेब विचार करुन निर्णय घेतील असे प्रजेना वाटले.

कै. बा.वि. उर्फ तात्या शिखरे यानीही प्रथमत: असे गृहीत धरले होते. त्या संबंधी, "सारावाढ लेखमालिकेच्या" सदरात ते म्हणतात की, श्रीमंत बाळासाहेब सरकार मिरजकर यांच्या काला-वधीत तरी रयतेवर जमिनीचा सारा वाढीची आपत्ती कोसळेल असे वाटले नव्हते. त्यांना खालसा मुलुखाप्रमाणे आपली रयत कराच्या

बोजाखाली पिळून निघावी असे सुरवातीपासून वाटत नव्हते. परंतु ह्याकडे दुर्लक्ष होऊन जो श्रीमंतानी सारावाढीचा निर्णय घेतला त्याबद्दल आश्चर्य वाटते.[१]

श्री. मोडक, लॅन्ड रेकार्ड सुपरिडेन्ट यांचा सारावाढ संबंधी कारणे

श्रीमंतानी १९२७ साली श्री. मोडक डी.एस्.लॅ.रे. सुपरिडेन्ट यांची नियुक्ती मिरज संस्थानात सर्व्हे सेटलमेंटकरिता केली होती. त्याकरिता दरबारतर्फे कांही अधिकारी मदतनीस म्हणून दिले होते. त्यांनी सर्व्हे सेटलमेंटमध्ये पुढील बाबीसंबंधी अहवाल तयार करून त्यामध्ये सारावाढ संबंधीची शिफारस केली होती. सारावाढ संदर्भात त्यांची खालील कारणे नमुद केली होती.

१) मिरज संस्थानच्या आर्थिक परिस्थितीत बदल.
२) लोकसंख्यात ८५ टक्के वाढ झाल्याने संस्थानची भरभराट.
३) दळणवळणात प्रगती.
४) बाजार स्थितीतील वाढ.
५) बागाईत क्षेत्राचा विस्तार.
६) औद्योगिक क्षेत्रात प्रगती.
७) शिक्षण प्रसाराकरिता दरबारतर्फे प्रगतीपर धोरणाचा अवलंब.

मि. मोडकसाहेब लॅ.रे. सुपरिडेन्ट व दरबारच्या अधिकाऱ्यांनी आपल्या अहवालात मिरज संस्थानातील तीन तालुक्यात शेतसारा वाढीची शिफारस केली होती. श्रीमंत राजेसाहेबांनी या शिफारशीनुसार शेतसाऱ्याची सरासरी वाढ, मिरज तालुका शेकडा ५६.४ %,

लक्ष्मेश्वर शेकडा ६०·०३% व मोडनिंब ५०·६६% या प्रमाणे, तीन प्रकारात सारावाढ केली. काही गावावर तर ७५ ते ७८% सारावाढ केली होती.[४]

श्री. मोडकसाहेब व त्यांच्या सहाय्यक अधिका-यांनी जे चौकशीचे काम करून वरील प्रमाणात सारावाढ केली त्याची वस्तुस्थिती अशी होती की या अधिका-यांनी जमिनीची प्रत, गट, क्षेत्र, याचे फेरबदल त्यांच्या सोईनुसार केले होते. तसेच ग्रामअधिका-यांनी जे आकडे दिले तेच ग्राह्य मानले व नवीन सारा आकारणी केली होती. मोडनिंब व लक्ष्मेश्वर तालुक्यातील सर्व खेड्यांची प्रत्यक्षपणे पाहणी न करता, फक्त मोजक्याच खेड्यांना भेटी देऊन त्या आधारावरच सर्व खेड्याकरिता जबर सारावाढीची शिफारस श्रीमंताकडे केली होती. सारावाढीच्या शिफारशीत रि.स. सेटलमेंटची मुदत ३० वर्षांची केली.

मिरज संस्थानात जी कारणे रि.स. सेटलमेंटनुसार नमूद करून सारावाढ केली तशा प्रकारची परिस्थिती वास्तवामध्ये नव्हती. मिरज संस्थानची आर्थिक परिस्थिती खालावलेली होती. म्हणून अभ्यासकांनी मिरज संस्थानचा उल्लेख हा "भिकार मिरज" म्हणून केला होता. मिरज संस्थानात पारशी व युरोपियन लोकांची भर पडून भरभराट होते हे विधानही विपर्यास्त स्वरूपाचे होते. लोकसंख्यावाढीचा विचार लक्षात घेतला तर ३६ वर्षांच्या काळात शेकडा साडेसहाप्रमाणे लोकसंख्येत घट झाली. परंतु मोडक अहवालात लोकसंख्या वाढीचे प्रमाण शेकडा ८५% चे दाखविले ते निराधार होते.[५]

के.बा.वि.उर्फ तात्या शिखरे यांनी "मिरज संस्थानातील सारावाढ" या लेखमालेत वास्तविक तालुक्याची लोकसंख्या ४११४ ने

आणि मिरज गावची लोकसंख्या ४११६ ने कमी झाल्याचे म्हटले होते.

मिरज तालुक्यातील दळणावळण स्थितीही अत्यत वाईट होती. तसेच उद्योग धंदेही मोडकळीस आले होते, मिरज शहरातील गुराचा बाजारही बंद करण्याच्या अवस्थेत आला होता.

मिरज तालुक्यात अपूरा पाऊस झाल्याने दुष्काळ परिस्थिती आणि पाण्याची टंचाई निर्माण झाली होती, कित्येकजणाच्या विहिरीही कोरड्यां पडल्या होत्या. अशी रयतेची वस्तुस्थिती असताना श्री. मोडकसाहेबानी बागायत क्षेत्रफळात निराधारपणे वाढ दाखवून सारावाढ केली. श्रीमंतानी संस्थानच्या उत्पन्नातून स्वतःचा खाजगी खर्च २/३ पणे खर्च केला. पण जनतेच्या हितासाठी एक पैसाही खर्च केला नाही. दुय्यम व प्राथमिक शिक्षणाचा खर्चही लोकल फंडातून केला जातो. ग्रामअधिका-यानी जे आकडे दिले ते विश्वासनिय समजून सारावाढ जाहीर केली. म्हणून त्यास शेतक-याची आर्थिक चौकशी म्हणून नये.[६] कारण प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे अवलोकन न करता शेतक-यावर असाह्य व अन्याय पद्धतीची सारावाढ केली.

श्री. मोडकसाहेबांचा शेतसारा वाढीचा अहवाल मि. अँडरसन या कमिशनर अधिका-याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला होता. आणि त्यांनी त्या अहवालातील शेतसारा आकारणीत कसल्याही प्रकारे बदल न करता उलट तो आकार दुप्पटपणे वाढ करण्याचे एक पत्र श्रीमंत राजेसाहेबांकडे पाठविले होते.[७] व त्यानुसार श्रीमंतांनी मिरज संस्थानातील रयतेवर असहाय्य व अन्यायी स्वरूपाची जबर सारावाढ जाहीर केली होती.

श्रीमंत राजेसाहेबांनी असे गृहीत धरले होते की, मिरज संस्थानातील रयत ही अज्ञानी असल्यामुळे त्याची अंमलबजावणी सहजपणे होईल. परंतु तसे घडले नाही कारण प्रजा-परिषदेची स्थापना झाल्यामुळे रयतेमध्ये जागृततेची भावना निर्माण झाली होती.

## जबर सारवाढी विरुध्द रयतेने स्विकारलेला सनदशीर मार्ग

श्रीमंत राजेसाहेबांनी गेल्या ६० वर्षात सारावाढ केली नाही या कारणानुसार मिरज संस्थानात जबर व अन्यायीपणे सारावाढ जाहीर केली. प्रजा-परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनात सारा वाढ करु नये म्हणून मागणी केली होती परंतु दरबारने त्याकडे दुर्लक्ष केले. श्रीमंताचे सारावाढ संबंधी जाहीरपणे अंमलबजावणी करण्याचे धोरण दिसून येताच प्रजा-परिषदेच्या कार्यकर्त्यांनी प्रजेचे सेवक या नात्याने रयतेमध्ये जागृती करण्याचे निश्चित केले. कै. बा.वि. उर्फ तात्या शिखरे व डॉ.नारायणराव जोशी यांनी प्रत्यक्षपणे खेड्यापाड्यात जाऊन रयतेची भेट घेतली. त्यांच्यामध्ये वाढीव सारावाढ संबंधी जागती निर्माण करुन तो वाढीव सारा कमी करण्याकरिता खालील प्रमाणे सनदशीर मार्गाचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला.

### १) सहयांचे अर्ज दरबारकडे पाठवून:

श्रीमंतानी जाहीर केलेल्या जबर व अन्याय्य सारावाढ विरुध्द मिरज संस्थानातील रयत लोकांनी रि.स. सेटलमेंट संबंधी तक्रारी अर्ज दि. १० जून १९२८ रोजी प्रजा-परिषदेच्यावतीने केला होता. ता अर्ज मिरज दरबारकडे पाठविण्यापूर्वी कै. बा.वि. उर्फ तात्या शिखरे

व डॉ. नारायणराव जोशी यांनी सर्व रयतेना समजावून सांगून त्यावर जवळ जवळ १८00 रयतेंच्या सह्या घेतल्या होत्या. या तक्रारी अर्जाचा नमुना खालीलप्रमाणे तयार केलेला होता.

श्रीमंत राजर्षि सर गंगाधर बाळासाहेब महाराज,
सरकार मिरज, यांच्या सेवेशी,

आमच्या ह्या तक्रार अर्जाचा सत्वर विचार व्हावा अशी श्रीमंताच्या चरणी आमची प्रार्थना आहे. मोजे....ता. मिरज येथील रयत लोकांच्या रि.स. सेटलमेंट करण्याबाबत तक्रारी आहेत त्या:

१) श्रीमंत सरकार बाळासाहेब महाराज यांनी उदारपणे आजपर्यंत संस्थानात रि.सर्व्हे केला नाही व पुढे करण्याचा नाही असे वेळोवेळी आम्हास सांगितल्यामुळे नापीक साली सूट दिली नाही व रयतेने मागू नये असे कळविले. सबब रि.स. सेटलमेंट लागू करणे वाजवी होणार नाही.

२) श्री. मोडक साहेबांची शिफारस सारावाढ संबंधी विचारात घेतली परंतु सारावाढीच्या जमिनीच्या प्रतवारी, गटवारी, किमती ठरविण्यापूर्वी रयतेना आपली बाजू मांडण्याकरिता तीन महिन्याचीही मुदत दिली नाही. त्यामुळे पुढील सर्व काम रद्द होण्यास पात्र होते.

३) श्री. मोडक साहेबांच्या अहवालातील माहिती ही एकतर्फी व वस्तुस्थितीच्या अगदी विरोधी आहे. त्यामुळे त्यांनी जे जमिनीचे कमाल दर व गट ठरविलेले होते ते चुकीचे होते.

... UNIVERSITY, KOL...

४) रि॰स॰ सेटलमेंट करताना वाटेल त्या प्रमाणात सारा वाढ करू नये असा ठराव लं.रे.कोड नियम जी.आर नं. नं. ५३३२/२९-१०-७४ व २६१९/२६-३-८४ या मध्ये आहे. या ठरावातील नियमाप्रमाणे सर्व तालुक्यांची किंवा गुप्रातील (गटातील) गावाची वाढ ही जास्तीत जास्त ३३% पेक्षा जास्त वाढ करता येते नाही. त्याप्रमाणे दुरुस्ती व्हावी अशी प्रजेची इच्छा आहे.

५) कांही खेड्यांना विशिष्ठ परिस्थितीनुसार सरकारच्या परवानगीने शेकडा ६६% पर्यंत सारा वाढ करण्याची ठरावानुसार तरतूद आहे परंतु बोलवाड, तानगाव शिरढोण या खेड्यांची सारावाढ अनुक्रमे ७७.८%, ७८.०८% अशी केली. ती नियमबाह्य असल्याने रयतेवर जुलूम होतो म्हणून तो कमी करणे महत्वाचे आहे.

६) ज्या कारणानुसार सारा वाढ केली आहे ते कारण ही समर्थनीय नाही. त्याकरिता योग्यपणे चौकशी केली नाही व रयतेंनाही त्या संदर्भात म्हणाने मांडण्यास संधी दिली नाही त्यामुळे सारा वाढ ही चुकीची ठरते.

७) श्री. मोडक साहेबांचा एकादाच आकार अमलात आणू नये व सेटलमेंटची मुदत ३० वर्षांची असावी ही शिफारस श्रीमंतानी बदलावी.

८) कायद्याप्रमाणे स॰ सेटलमेंट लागू करण्यात येईल त्या सालात फाळेची वाढ होत नसून पुढील साली त्या वाढीचा अमल होण्याचा असतो परंतु १३३७ फसली साल संपत आले व तरम

या खाली लागू करता येत नाही म्हणून जुलै अखेरपर्यंत हे साल एवढयासाठी दोन महिन्यांनी वाढविले आहे. हे करणे कोणत्याही प्रकारे वाजवी होणार नाही. मद्दाम जाणून बुजून रयतेचा फायदा हिरावून घेवू नये. त्याकरिता तसे साल बदलू नये व जरी बदलले तरी तरम (आकार) लागू करु नये.

९) श्री. कोंडफसाहेबाचा अहवाल हा इंग्रजी भाषत आहे तो रयतेच्या माहितीकरिता मराठी भाषेत करावा तो तालुक्याच्या ठिकाणी ठेवावा आणि पुढे रयतेना त्यासंबंधी तक्रारी करण्यास्तव ठराविक मुदत द्यावी.

१०) रि.स. सेटलमेंट प्रमाणे सारा वाढ लागु करण्यापूर्वी दोन महिन्याचा कार्यकाल रयतेना तक्रारी संबंधी ल.रे. नियमाप्रमाणे सवलती जाहीर करुन ही या वेळी एकच महिन्याची मुदत दिली आहे. ते कायद्यास धरुन नाही म्हणून रयतेचे म्हणाने मांडण्यासाठी मुदतवाढ दिल्यानंतरच शेतसारा आकारणी करावी.

११) जवळच्या खालसा मुलखातील सारा आकारणी कमी प्रमाणात असताना मात्र मिरज तालुक्यातील सारा वाढ भयंकर व असह्य आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करुन सारा वाढ करण्याच्या बाबतीत सरकारतर्फे व रयतेतर्फे म्हणाचे समजून घेण्यासाठी अधिकारी व बिन अधिकारी रयतेचे प्रतिनिधी घेऊन त्याची चोकशी कमिटी नेमावी व त्या कमिटीने चौकशी करुन रिपोर्ट करावा आणि त्या प्रमाणे सारा वाढ करावी.

आमच्या वरील तक्रारी आहेत. त्या तशा नसल्या तरी आपल्या रयतेची वास्तविक स्थिती लक्षात घेवून श्रीमंतानी उदारपणे रि.स. न करण्याचे जे वचन दिले आहे त्याचा विचार करून प्रजेचे म्हणजे योग्य प्रकारे पुढे मांडण्याची संधी देण्यासाठी मराठी भाषेत श्री मोडक साहेबाचा अहवाल लोक निदर्शनास आणावा व जी जबर सारा आकारणी केली आहे ती कमी करावी.

मिरज संस्थानातील रयतेनी ह्या अर्जाच्या प्रति,

१) गावकामगार पाटील,

२) कलेक्टर व कारभारी संस्थान मिरज,

३) श्रीमंत सरकार तर बाळासाहेब मिरज संस्थान याचे सेवेशी.

श्रीमंत युवराज तात्यासाहेब महाराज याचे मार्फत,

आपले रयत,

म्हणून सादर केला होता.[८]

मिरज संस्थानातील रयतेनी साराबंदीच्या चळवळीची सुरुवात ही अशाप्रमाणे तक्रारी अर्जाद्वारे केली होती. रयतेच्या तक्रारी अर्जाचे उत्तर दरबारने ता. १८/१२/१९२८ जाहीरनामा काढून दिले व तो सर्व खेड्यात ता. १०/१/१९२९ रोजी माहितीस्तव गावकामगाराकडे पाठवला होता आणि त्यांनी तो ११/१/१९२९ रोजी चावडीवर चिकटीवला होता. याचा अर्थ असा की दरबारने रयतेच्या तक्रारी अर्जाचे उत्तर हे सात महिन्यानतर दिले. या उत्तरामध्ये अहवाल मराठी भाषेत करणे, जबाबदार व समंजस अशा रयत

प्रतिनिधींना गावचे म्हणाने मांडण्याची संधी मान्य केली. रि.स. सेटलमेंटची मुदत ३० वर्षा ऐवजी २० वर्षे केली. परंतु तक्रारी अर्जातील इतर बाबींचा विचार करण्यात आला नाही.[९]

प्रजा-परिषदेच्या प्रजा सेवकांना रयतेच्या तक्रारी अर्जाचा प्रभाव दरबारवर पडणार नाही हे माहित होते, परंतु या माध्य-मातून रयतेमध्ये जागृती करण्याचे त्यांचे प्रयत्न मात्र यशस्वी झाले होते. तक्रारी अर्जाच्या नंतर त्यांनी खेड्यापाड्यात जाऊन लोक सभा घेऊन त्याद्वारे अन्याय दूर करण्याचा मार्ग त्यांनी स्विकारण्याचे निश्चित केले होते.

## २) लोकसभा आयोजित करुन तक्रार निवारण

रयतेच्या तक्रारी अर्जाची विशेष दखल घेतली जाणार नाही म्हणून प्रजा व प्रजा पुढाऱ्याच्या सम्मतीने लोकसभा भरवून सारावाढी संदर्भात लोकमत प्रकट करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे लोकसभा ही जाहीरपणे मिरज येथे ता.२२ जून १९२८ रोजी आयोजित केली. परंतु ही सभा भरवण्याकरिता मिरज संस्थानच्या जिल्हा मजिस्ट्रेटनी परवानगी नाकारली त्यामुळे लोकसभेकरिता आलेल्या रयतांना निराश होऊन, निरर्थक पायपीट करुन आपआपल्या गावोगावी परत जावे लागले.[१०]

दरबारने सभाबंदीचा कायदा वापरुन सारा बंदी चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला होता परंतु रयतेनी व प्रजा पुढाऱ्यानी ही चळवळ बंद न पडता उलट ती अधिक उग्रपणे करण्याचा निर्णय घेतला होता.

३) विनंतीचा मार्ग: (तार व विनंती पत्राद्वारे)

सभा भरविण्यास बंदी घातली म्हणून मिरज संस्थानच्या प्रजा-परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. बाबुराव गोखले यांनी श्रीमंताना रयतेच्या प्रतिनिधीच्या शिष्टमंडळाची मुलाखत घेण्याबद्दल तारेने विनंती केली या तारेचेही उत्तर मिळाले नाही म्हणून पुन्हा त्यांनी श्रीमंत सर बाळासाहेब व श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांना विनंती पत्र पाठवले. याचेही उत्तर आले नाही म्हणून स्मरणपत्र ही पाठवले होते. परंतु त्याचा खुलासा दरबारने कळविला नाही.[११]

४) प्रार्थनेचा मार्ग:

वरील सनदशीर मार्गाचा अवलंब करून ही यश न मिळाल्यामुळे कै. तात्या शिखरे व डॉ. नारायणराव जोशी यांनी प्रार्थनेचा नवीन एक उपाय सुचविला होता. या उपायाप्रमाणे प्रत्येक गावातील लोकांनी एकत्रित येवून श्रीमंताच्या पुढे हात जोडून व पदन पसरून प्रार्थना करण्याचे ठरविले. मिरज संस्थानातील कांही गावच्या रयतेनी श्रीमंताची भेट घेवून नवीन उपाय योजनेनुसार प्रार्थनाचा मार्ग अवलंबिला परंतु श्रीमंतानी श्री गोडक साहेबाचा अहवाल मराठी भाषेत करण्याचे तेवढे वचन दिले होते.[१२]

वरील मिरज संस्थानातील रयतेने केलेल्या सनदशीर चळवळीचे स्वरूप सविस्तरपणे माहिती इंग्रजी व मराठी वृत्तमान पत्रामधून सारा वाढीसंबंधी प्रसिद्ध होत होती. परंतु याकडे श्रीमंतानी दुर्लक्ष केले होते. या उलट मिरज संस्थानातील रयत ही न्याय मागण्यासाठी कांही

मार्ग सापडेल का म्हणून सतत प्रयत्न करीत होती.

मिरज संस्थानचे प्रमुख श्रीमंत राजेसाहेब रयत आणि त्यांचे पुढारी ह्यांच्यामध्ये तडजोड करण्याकरिता बाहेरील विद्वान व कर्ते पुढारी बोलावून काही फायदा झाला तर तसे करण्याचे ठरविले. व त्याकरिता प्रजा पुढारी त्या मार्गाला लागले आणि मिरज संस्थान प्रजा परिषदेचे चौथे अधिवेशन भरवून सारावाढ विरुद्ध लोकमत जागत करण्याचे निश्चित केले.

५) ठराव स्पाने:

मिरज संस्थान प्रजा-परिषदेचे चौथे अधिवेशन मालगांव येथे भरविण्याचे रयतेने ठरविले होते. परंतु दरबारने नकार दिल्यामुळे ते मिरज येथे ता. ९/९/१९२८ रोजी दरबारच्या इच्छेनुसार श्री.गोविंदराव रानडे, वकील यांच्या अध्यक्षतेखाली भरले. या प्रजा-परिषदेच्या वेळी दरबारने पोलिसामार्फत कडेकोट बंदोबस्त करून परिषदेतील ठराव प्रजेला समजू नये म्हणून दडपशाही धोरणाचा अवलंब केला होता. अशा परिस्थितीतही के. तात्या शिखरे व श्री.पुंडलिकजी कातगडे यानी अधिक परिश्रम घेवून अधिवेशन यशस्वी केले. या अधिवेशनास मिरज संस्थानातील तिनही तालुक्यातील जवळजवळ एक हजार रयतेचे प्रतिनिधी आले होते. त्याशिवाय बाहेरील कार्यकर्ते ५० ते ७५ हजर होते.

या प्रजा-परिषदेपुढे महत्त्वाचा प्रश्न सारा वाढीचा असल्यामुळे त्या संदर्भात डॉ. नारायणराव जोशी यांनी सारावाढीचा ठराव मांडला. त्यांनी मोडकांच्या अहवालावर मुद्देसूद व निर्भिडपणे

टिका केली. यानंतर इतर वक्त्यांची भाषणे झाली होती. त्यामध्ये श्री. माधवराव आठवले वकील सांगली व दे.भ. श्री. बाबुराव गोखले (पुणे) यांचा समावेश होता. त्यांच्या भाषणांचा परिणाम रयतेत झाला व शेवटी सारा वाढ चौकशी करिता सरकार व लोक नियुक्त सभासदांची एक मिश्र समिती नेमण्याचे ठरविले.[१३]

या परिषदेत मंजूर केलेल्या प्रजा-परिषदेच्या ठरावा संबंधी ता. १६/९/१९२८ च्या "मराठा" वर्तमान पत्राचे संपादक श्री. दा. वि. गोखले असे म्हणतात की, प्रजा-परिषदेने श्रीमंताकडे मिश्र कमिटीची मागणी सारावाढ चौकशी करीता केली होती आणि या कमिटीचा अहवाल जोपर्यंत प्रकाशित होत नाही तोपर्यंत सारावाढ अंमलात आणू नये, याकडे दुर्लक्ष केले गेले तर श्रीमंत राजेसाहेबांची वृत्ती नोकरशाहीच दिसून ते बार्डोलीप्रमाणे प्रशासक ठरतील. म्हणून त्याकरिता ही सूचना करण्यात येत आहे.[१४] अशाच प्रकारचा इशारा "संस्थानी स्वराज्य", केसरी, वर्तमानपत्राने देखील संस्थानाधिपतींना दिला होता.

प्रजा-परिषदेतील मंजूर केलेला सारावाढ संबंधीचा ठराव श्रीमंताच्या नजरेस आणून देण्याकरिता श्री. गोविंदराव रानडे, वकील यांच्या अध्यक्षतेखाली एक समितीची निवड केली होती आणि त्याप्रमाणे खेडोपाडी जाऊन प्रजापरिषदेचा संदेश कळविण्याचे ठरविले होते.

## गावोगाव सभेस नकार, परंतु खाजगी सभेमार्फत लोक जागृती

प्रजा-परिषदेतील ठरावाची माहिती रयतेला कळू नये म्हणून

दरबारने सभाबंदी जाहिर केली. प्रजा-परिषदेचा संदेश हा खेड्यातील रयतेना कळण्यासाठी गावोगाव सभा घेण्याची परवानगी प्रजा-परिषदेच्या चिटणीसानी मागितली परंतु त्यास नकार देण्यात आला. या पाठीमागील दरबारचा उद्देश हा सारावाढ कायम करण्याचाच होता. परंतु प्रजापरिषदेच्या पुढा-यानी जाहीर सभा घेण्यास बंदी असली तरी खाजगी सभा, खाजगी जागेत १६-१७ गावात आयोजित करुन संदेश दोरा पूर्ण केला होता. या मध्ये के. तात्या शिखरे आणि पुंडलिकजी कातगडे यानी महत्त्वाची कामगिरी बजावली. या खाजगी सभेच्या बाबतीत ही सार्वजनिक व्याख्यान हे कारण दाखवून खटला भरण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्यास यश आले नाही.

प्रत्येक गावामध्ये प्रजा सभा स्थापन करुन त्याच्यामार्फत "एक मुख्य प्रजासभा" स्थापन केली व त्याद्वारे काँग्रेसच्या धर्तीवर रयतेमध्ये अधिक प्रमाणात जागृती केली होती.[१५]

प्रजा-परिषदेने "मिश्र समिती" मार्फत सारावाढीसंबंधीची फेर चौकशीची मागणी दरबार कडून लवकर मान्य होणार नाही म्हणून रयतेने आपली एक स्वतंत्र चौकशी समिती नियुक्त करण्याचे ठरविले. व त्या समितीचा अहवाल निरज दरबारकडे करण्याची सुचना पुढे येऊन कार्यकारी मंडळाची सभा भरविण्यात आली. कार्यकारी मंडळाची सभा भरविण्यात आली. कार्यकारी मंडळाच्या सभेने स्वतंत्र चौकशी कमिटी श्री. गोविंदराव रानडे, वकील यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली. या समितीमध्ये के. तात्या शिखरे, श्री.पुंडलिकजी कातगडे यांचाही समावेश होता. ही चौकशी समिती पूर्णपणे

रयतेची होती. श्री.पुंडलिकजी कातगडे यांनी गावोगाव जाऊन चौकशी करण्याचे कामही चालू केले होते. परंतु दरबार तर्फे मिश्र समिती नेमून चौकशी करणार की नाही" या करिता प्रजा-परिषदेमार्फत एक शिष्टमंडळ श्रीमंत सर बाबासाहेब व युवराज तात्यासाहेब यांच्याकडे पाठविण्याचे ठरविले. त्या संदर्भात प्रजा परिषदेच्या अध्यक्षांनी पत्र-व्यवहार व बोलणीही सुरु केली होती.

६) रयतेचे शिष्टमंडळ व त्यास नकार:

प्रजा-परिषदेने मागणी केलेल्या ठरावाचे दरबार काय करणार या करिता प्रजेचे शिष्टमंडळ ठरविले होते. प्रजेच्या शिष्टमंडळात दे.भ. श्री. दा.वि. गोखले, श्री. वामनराव पटवर्धन, श्री.श्री.ग. वझे, श्री. गोविंदराव रानडे, वकील, श्री.बा.वि.शिखरे, श्री. पुंडलिकजी कातगडे,, श्री. बाबाण्णा धुळी हया सात सभासदांचा समावेश केलेला होता. प्रजा-परिषदेच्यावतीने निघालेल्या या शिष्टमंडळाची मिरज संस्थानचे अधिपती व श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांच्या भेटीची ता. ३०/१०/१९२८ रोजी निश्चित झाली होती.

प्रजेच्या शिष्टमंडळास भेट घेण्यास श्रीमंतांनी नकार दर्शविला होता. खाजगी व्यक्ती या नात्याने देभ. श्री. दा.वि. गोखले, श्री. वामनराव पटवर्धन व श्री. रानडे वकील यांना भेटण्यास परवानगी असल्याचे व त्यानंतर शिष्टमंडळास मुलाखत देण्याचे कळविले. अशा रितीने प्रथम खाजगी व्यक्ती या नात्याने रानडे पटवर्धन-गोखले यांची भेट झाली व नंतर प्रजेच्या शिष्टमंडळातील इतर सभासद श्रीमंत युवराज तात्यासाहेबांच्या भेटीस गेले होते. प्रजेच्या शिष्टमंडळाचे अध्यक्ष

श्री. रानडे वकील यांनी परिषदेचा अहवाल श्रीमंतास सादर करुन त्यातील ठरावांचा सहानुभूतीपुर्वक विचार करावा अशी सर्वानुमते विनंती केली. श्रीमंत युवराजांनी आपल्या हाती कांही नाही, ठराव रितसरपणे श्रीमंत सरकारकडे पाठविला जाइल एवढेच आश्वासन दिले. त्यानंतर शिष्टमंडळ श्रीमंत सर बाळासाहेबांकडे भेटण्यास गेले होते. परंतु श्रीमंतानी "मी अशा प्रजा शिष्ट-मंडळास भेटणार नाही, व इतर कामाकरिता ते भेटणार असल्यास त्यांनी मी भेट देण्यास तयार आहे" असा निरोप खाजगी कारकून रा. दप्तरदार मार्फत कळविला होता. अशा रितीने श्रीमंतानी प्रजेच्या शिष्टमंडळास भेटण्यास नकार दर्शविला होता. त्यानंतर प्रजेचे शिष्टमंडळ श्रीमंतानी नकार दर्शविल्यामुळे रिकाम्या हातानेच परत फिरले होते.

प्रजेच्या शिष्टमंडळाची कामगिरी पाहण्याकरिता अनेक खेड्यातून शेकडो लोक मिरजेस आले होते. परंतु या सर्वांची घोर निराशा झाली होती. यानंतर डॉ. नारायणराव जोशी यांच्या दिवाण खान्यात सर्वमंडळी एकत्रीत येवून त्या ठिकाणी प्रजेच्या शिष्टमंडळ कार्यकर्त्यांनी भाषणे केली आणि तेथे या पुढे सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. सत्याग्रहाची ता. ४/११/१९२८ रोजी दुपारी ११ वा निश्चित केली होती. या सत्याग्रहाकरिता सर्व गावच्या रयतेने "हिराबाग" येथे जमण्याचे ठरविले. श्रीमंतानी प्रजा शिष्टमंडळास भेट देण्याइतका साधा शिष्टाचार पाळला नाही म्हणून त्यांच्या दुराग्रही धोरणाविरुध्द सनदशीर प्रतिकाराचे शेवटचे शस्त्र जे की, "सत्याग्रह" शिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता.[१६]

## ७) "हिराबाग बंगला" ठिकाणाचा पहिला सत्याग्रही लढा:

प्रजेच्या शिष्टमंडळास भेटण्याचा श्रीमंतानी नकार दर्शविल्यामुळे व सभाबंदी करून दडपशाहीचे धोरण स्विकारून एकतंत्रीपणे राज्यकारभार हा एका व्यक्तीच्या हुकूमान्वये कसा चालतो हे प्रजेच्या निदर्शनास प्रत्यक्षपणे आले होते. दरबारची ही वृत्ती मोडीत काढून आपल्या रयतेच्या वर बसविलेला जबर सारा व त्यांची गा-हाणी श्रीमंताच्या कानावर घालण्यासाठी ता.३०/१२/१९२८ रोजीच "सत्याग्रह" करण्याचा निर्णय घेतला होता. श्रीमंत राजेसाहेबांच्या "हिराबाग" बंगल्याच्या दारी धरणे धरून म्हणजेच सत्याग्रह करून सारावाढीचा अन्याय दुर करण्याचा निरधार शेतक-यांनी केला होता. सत्याग्रह यशस्वी करण्याकरिता प्रजेच्या पुढा-यांनी खेडोपाडी जाऊन रयतेची मने तयार केली होती. या करिता श्री. पुंडलिकजी, श्री. भैयाशास्त्री वाटवे, श्री. बाबाण्णा धुळी, श्री. बोधले बुवा, श्री.रा. ज्ञानोबा पाटील इत्यादी गांव पुढा-यांनी परिश्रम घेतले होते.

रविवार ता. ४/११/१९२८ रोजी सरकारच्या चरणी प्रार्थना करून धरणे सत्याग्रह करण्याकरिता मिरज तालुक्यातील रयत आपले गा-हाणे दुर करण्यासाठी सर्व तयारीनिशी जवळ जवळ दोन हजार पाचशेहून अधिक संख्येने हजर राहिली होती. यापैकी बहुतेक सर्व रयत श्रीमंत राजेसाहेबापुढे धरणे धरण्यासाठी निघाली होती. त्याच्या समवेत श्री. बा.वि. शिखरे, श्री. पुंडलिकजी कातगडे, डॉ. नारायणराव जोशी, श्री. भैयाशास्त्री वाटवे, श्री.बा.आ. धुळी श्री दत्तोपंत आंबेकर वगैरे मंडळी होती.

रयत लोकांची गर्दी श्रीमंताकडे येत आहे असा निरोप प्रजेच्या पुढा-यांनी कळविला होता. त्यास श्रीमंत सर बाळासाहेब सरकारनी पो.इ.रा. पाठक व खा.का. दत्तोपंत दप्तरदार यांच्या मार्फत "उद्या सोमवारी मी वाड्यात येईन, तीथे भेट घेईन. आज येथून सर्वजण जा" असा निरोप रयतेला पाठविला होता.

प्रजा-परिषदेच्या कार्यकर्त्यांनी श्रीमंताच्या पुढे बोलण्याकरिता प्रत्येक गावचा एकेक प्रतिनिधी निवडलेला होता. त्या प्रतिनिधींनी "सरकार आज आम्हां रयतेची भेट घेण्यास तयार नसतील तर आम्ही येथून आज जाणारच नाही" असे उत्तर दिले. त्यानंतर पो.इ.श्री. पाठक व खा. का. श्री. दत्तोपंत दप्तरदार यांनी श्रीमंताना भेटण्याचा आग्रह सोडावा असा प्रयत्न केला परंतु त्यास यश आले नाही. शेवटी कळठेपिरानचे श्री. बोधले बुवानी, आज येथून कोणीही जाणार व हलणारही नाही" असे सांगितले व हे सर्व रयतेतर्फे सांगतो असे बोलून दाखविले. त्यानंतर श्रीमंताच्या अधिका-यानी या बोलण्यापासून जर तुम्हीं वागला तर त्यानुसार काही कारवाई झाल्यास ती तुम्हीं सहन करण्यास तयार आहात काय ? असे विचारले. "हो तयार आहे," असे रयतेनी कबुल केल्यानतर श्री. दप्तरदार यांची श्री. पुंडलिकजी यांना एकट्यानाच श्रीमंतानी बोलावल्याचे सांगितले. परंतु त्यास त्यांनी नकार दिला होता. रयतेच्या प्रतिनिधी समवेत श्रीमंताना भेटेन, असे कळविल्यानंतर ते श्रीमंतानी मान्य केले होते व निरनिराळ्या गावचे प्रतिनिधी श्रीमंताच्या भेटीस गेले. त्यामध्ये श्री. पुंडलिकजी कातगडे, श्री. बा.आ. घुकी, श्री.चुनीलाल राठी,

श्री• बोधले बुवा, श्री• माधवराव देशपांडे, श्री• कृष्णाप्पा कानडे, श्री• सा•ग• पाटील, श्री•ज्ञा•ज• पाटील, श्री•आत्माराम इंगवले करोली, श्री• वि•रा• मिरजे, याप्रमाणे इतर गावचे प्रतिनिधींचाही समावेश होता•[१७] अशा रितीने श्री•पुंडलिकजी कातगडे व १५-१६ गावचे प्रतिनिधी श्रीमंताना भेटले होते. त्यांनी श्रीमंताना नमस्कार केला व नंतर ती खाली बसली• नंतर श्रीमंत सरकार व श्री•पुंडलिकजी आणि इतर पुढारी यांच्यामध्ये वाटाघाटी सुरु झाल्या•

## वाटाघाटीचे स्वरुप व श्रीमंत सरकारचे आश्वासन

श्रीमंत सरकारचे भेटीस गेल्यानंतर श्री• पुंडलिकजी कातगडे यांनी १५-१६ प्रतिनिधींतर्फे रयत आपल्या दारी का जमली व त्यांची मागणी कोणती आहे हे सांगितले• श्री•पुंडलिकजी यांनी रयतेची मागणी सादर करतांना म्हटले की, "सारावाढीच्या बाबतीत जो अन्याय झाला आहे त्याची चौकशी व्हावी, त्याकरिता एक कमिटी नेमावी, त्यातील निम्मे सभासद लोकनियुक्त व निम्मे सरकार नियुक्त असावेत. चौकशी अंती जे ठरेल, ते मान्य करण्यास रयत तयार आहेत" असे सांगितले. त्यावर श्रीमंत सर बाळासाहेब सरकार म्हणाले की, "मी असली कमिटी नेमण्यास कधीही तयार नाही, मग काय व्हावयाचे असेल ते होईल. मी ही तसा निश्चयी आहे•" यावर श्री• पुंडलिकजी म्हणाले की, ही रयत आपल्या विरुध्द वर्तन करण्याकरिता येथे आलेली नसून ती आपल्याकडून न्याय मिळवण्याकरिता आली आहे• या वेळी श्रीमंत सरकार, बाळासाहेब व पुंडलिकजी ह्यांच्यामध्ये बराच वादविवाद झाला व शेवटी प्रत्येक

गावात जाऊन सारावाढीची चौकशी करुन अन्याय दुर करु असे ठरले. हे चौकशीचे काम पूर्ण होईपर्यंत तरम (आकारबंद) जाहीर केला जाणार नाही असे आश्वासन श्रीमंत राजेसाहेबानी हजारो रयतेच्या पुढे उभे राहून दिले.[१८] सारा वाढीची चौकशी श्रीमंत व पुंडलिकजी हे प्रत्येक गावात जाऊन करणार होते व त्यानंतरच तरम अमलात येणार होता त्यामुळे ही मिश्र समितीच मानावी असे प्रजा परिषदेतर्फे ठरविले.

वरील प्रकारचे आश्वासन दिल्यानंतर वाढीव सारा आकार हा चौकशी अंती प्रसिद्ध केला जाईल. रयतांनो तुम्ही काळजी करु नका, आता आपआपल्या घरी जा. पुन्हा येथपर्यंत येण्याचा त्रास घेऊ नका असे श्रीमंतानी रयतेसमोर आपला मनोदय व्यक्त केला यानंतर पुंडलिकजीनी सर्व रयतेला असे सांगितले की, "आपले येथेच काम संपले नसून, येथून आपल्या लढयास खरी सुरवात झाली. आम्ही दोघेजण जेव्हा आपल्या गांवी चौकशीसाठी येऊ तेव्हा आपआपला पुरावा, कागदपत्र तयार ठेवा, तुम्ही आपआपल्या घराकडे निघून जा."

श्रीमंतानी स्वत:च्या मुखाने सारावाढीच्या संदर्भात आश्वासन दिल्यानंतर सर्व रयत आपआपल्या गांवीनंतर निघून गेले.

श्रीमंत सरकारने सारा वाढ चौकशी करण्याचे ठरविल्यामुळे मिरज संस्थान प्रजा-परिषदेच्या वतीने नियुक्त केलेल्या सारा वाढ चौकशी समितीचे कामकाज आता उरले नाही म्हणून तीचे विसर्जन ता. ४/११/१९२८ रोजी केले. अशा रितीने सारा बंदी चळवळीचा

पहिला सत्याग्रहाचा लढा संपुष्टात आला आणि या लढयानंतर ता. ५/११/१९२८ म्हणजे दुसऱ्या दिवसापासूनच श्री. पुंडलिकजी यांना श्रीमंतानी बोलावले व कामकाजास सुरुवात करण्याचे सांगितले. यावेळी श्रीमंत, श्री. पुंडलिकजींना म्हणाले, की, दोन ते तीन गांवावर जाणून बुजून अन्याय झाला आहे. कांही गांवातून आपण जाऊ व कांही गांवातील लोकांना येथे बोलावून हे काम संपवून टाकू. तुम्ही सर्व कागदपत्र तपासून टिपणी काढून तयार ठेवा यावर पुंडलिकजी म्हणाले की, चार ते पांच दिवस लागले तरी आपण प्रत्येक गांवाला जाऊन प्रत्यक्ष पाहणी करु.

श्री. पुंडलिकजींनी, दरबारच्या अधिकाऱ्यांना श्री. मोडक अहवाल सारावाढीची कागदपत्रे मागितली परंतु सुरवातीस ती देण्यास त्यांनी टाळाटाळ केली. त्यानंतर श्री. पुंडलिकजींनी श्रीमंताकडे तक्रार केली त्याचा परिणाम म्हणून सर्व कागदपत्रे दाखविली गेली श्री. पुंडलिकजींनी सर्व कागदपत्र वाचून त्यामधून आवश्यक ती टिपणी तयार केली. यानंतर अधिक माहिती मिळवण्याकरिता ते पुण्यास गेले होते.

श्रीमंत सरकार व श्री. पुंडलिकजी यांच्या मध्यस्थीने सारावाढीचे प्रकरणाचा शेवट होईल हे दरबारच्या कांही अधिकाऱ्यांना पसंत पडले नाही म्हणून त्यांनी अडथळा आणण्याची कारस्थाने सुरु केली होती. सारावाढ कमी करण्याकरिता चौकशी कमिटीशिवाय इतर मार्गाचा अवलंब करण्याचा प्रयत्न दरबारच्या अधिकाऱ्यांनी सुरु केली. पहिल्या सत्याग्रहाच्या वेळी श्रीमंत सरकार बाळासाहेब व श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांचा थोडा संघर्षही झाला होता.

## शेतसारा कमी करण्याची वकील मंडळीची योजना

श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांनी श्री.बाबूराव काशीनाथ जोशी (वकील) यांच्या सारख्यांना आपल्या हाताशी धरून सारावाढ कमी करण्याची योजना आखली होती. श्रीमंतांनी या संदर्भात रयतेच्या पुढा-यांना व कांही वकील मंडळींना बोलावून घेऊन कोठपर्यंत तडजोड करावी असे ठरवण्याचा प्रयत्न केला. श्रीमंत युवराज यांच्या सांगण्यावरून श्री. बा.का. जोशी वकील यांनी "हिराबागेत" श्री. गोविंदराव रानडे, श्री.अनंतराव दातार, श्री. भास्करराव मराठे, श्री. रा.धों. शिराळकर या वकील मंडळींना बोलावून घेतले. वकील मंडळीत श्री. बा.का. जोशी सह एकूण पाच व्यक्तींचा समाविष्ठ झालेला होता. त्यांनी श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांच्याबरोबर ता. ११/११/१९२८ रोजीच्या वाटाघाटीत ४० टक्के सारावाढीच संम्मती दिली व त्यानुसार पुढील प्रकरणाचा पाया घातला गेला असल्याचे दिसून येते.

वकील मंडळीमध्ये ठरलेल्या योजनेचे स्वरूप असे होते की, सारावाढीच्या संदर्भात आम्ही ४० टक्के पर्यंत संमती देतो परंतु त्यानुसार पुढील चार गोष्टी सुधारणा झाल्या पाहिजेत अशी वाटाघाट झाली होती. त्या वाटाघाटी म्हणजे,

१) स्वतंत्र हायकोर्टची स्थापना,
२) पाण्याचा पुरवठा,
३) मोफत प्राथमिक शिक्षण,
४) जबाबदार राज्यपध्दती.

वरील सुधारणापैकी तीन राजकीय सुधारणा लवकर करण्याचे श्रीमंतानी मान्य केले. परंतु चौथी सुधारणा पुन्हा सवडीने करता येईल म्हणून तशीच सोडून दिली होती. या वाटाघाटीनुसार जेवढे मिळेल त्या सुधारणा करून घेण्यास काय हरकत आहे असे वकील मंडळीनी ठरविलेनंतर ते श्रीमंताकडे गेले. वरीलप्रमाणे तडजोड रयतेमध्ये करण्याची जबाबदारी श्रीमंतांनी वकी मंडळीवर सोपवून टाकली व ४० टक्के पर्यंत सारा वाढीस मान्यता दिली होती.[१९] वकील मंडळी समवेत झालेल्या वाटाघाटीची प्रसिध्दी वर्तमानपत्रातून देण्याचे ठरले परंतु वर्तमानपत्रातून ही बातमी श्री. रानडे वकील यांच्या म्हणान्यानुसार छापून नये म्हणून कळविल्यामुळे जाहीर झाली नाही. अशारितीने श्री. शिखरे यांनी प्रयत्न करून श्रीमंत युवराजांची वकील प्रणीत योजना प्रसिध्दीपासून हाणून पाडली होती.[२०]

या वकील मंडळीच्या ४० टक्के सारा वाढ तडजोडीस मुळीच तयार होऊ नका म्हणून श्री. तात्या शिखरे, श्री. पुंडलिकजी व डॉ. नारायणराव जोशी यांनी सर्व खेड्यातून दौरा केला व रयतेची मने पुढच्या सत्याग्रह चळवळीसाठी तयार करून ठेवली होती.

श्री. पुंडलिकजी कातगडे यांनी प्रश्नमालिका प्रकाशित करून अतिशय काळजीपूर्वक सारावाढ चौकशीचे काम करीत होते. त्यांनी अन्याय व जबर सारावाढीचे टिपणे करून त्यासंदर्भात पुण्यास जाऊन द.भ.बाबूराव गोखले व वामनराव पटवर्धन यांच्याशी चर्चाही केली होती. ते पुण्याहून दि. ११/११/१९२८ रोजी परत मिरज येथे आल्यानंतर श्रीमंत सरकारकडे चौकशी कमिटीसंबंधी वाटाघाटीस सर्व तयारी

सह गेले होते. तेथे श्रीमंतानी गावातील वकील मंडळी माझ्याकडे आली होती व आता चौकशीची गरज नाही. सर्व काम संपले आहे, असे सांगितले. त्याच वेळी श्री. पुंडलिकजीनी "रयतेवर फार अन्याय झाला आहे ते निवारण्याकरिता पुन्हा त्यांना चळवळ करावी लागेल. असे म्हणून दाखविले. यानंतर ते श्रीमंत युवराज तात्यासाहेबांना भेटण्यास गेले व श्रीमंतांनी आपणास भेटण्यास सांगितले असे त्यांना म्हणाले व यावर "मी त्यांना विचारून काय करावयाचे हे सांगेन, त्यांनी माझ्याकडे का पाठवले हे मला माहित नाही" असे ते म्हणाले.

वरील प्रमाणे रयतेच्यावतीने मान्य केलेल्या व श्रीमंताच्याही आकांक्षेनुसार सारावाढ चौकशीचे प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या श्री.पुंडलिकजी यांच्यावर त्यांनी अविश्वास दाखवून मिरज संस्थानच्या प्रजेचा वचनभंग केला.

या सर्व परिस्थितीतून मार्ग काढण्याकरिता श्री. बा.वि.शिखरे श्री. बाबाण्णा धुळी, डॉ. नारायण जोशी व इतर रयत प्रतिनिधींनी "पुन्हा सर्व गावचे लोक हिराबागेभोवती जमून सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला व त्या करिता ता. १५/११/१९२८ रोजी एकत्र येण्याचे ठरविले होते.

## हिराबाग वाड्यासमोरील रयतेचा दुसरा सत्याग्रह

शेतकरी रयतेनी पुन्हा सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला परंतु दरबार तो सत्याग्रह दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु

दरबार पुणीत दडपशाही विरुद्द रयतेनी "चार हजार" संख्येने ता. १५/११/१९२८ रोजी श्रीमंताच्या हिराबाग वाड्याच्या समोर येऊन धरणे धरण्याचा सात दिवसापर्यंतचा म्हणजेच ता. २१/११/१९२८ पर्यंतचा सत्याग्रह यशस्वी केला. हे सत्याग्रहाचे युद्द पाहण्याकरिता पुण्याहून श्री. दा.वि. गोखले, श्री. वामनराव पटवर्धन, श्री. ग.वि. केतकर वगैरे मंडळी मुद्दाम आली होती. सत्याग्रहाच्या या सात दिवसाच्या काळात दरबारने एकूण नऊ व्यक्तीवर कलम १२७ नुसार नोटीसा बजावल्या होत्या. त्यामध्ये श्री. बाबाण्णा धुळी, श्री. चुनीलाल शेटजी, श्री.माधवराव देशपांडे, श्री. बोधले बुवा, डा. नारायण जोशी, श्री. दादा भंडे, श्री.दत्तु पाटील, श्री. यशवंत पाटील यांचा समावेश होता. या मंडळीनी कायदा भंग करावयाचा नाही म्हणून त्या नोटिसा स्विकारल्या होत्या.

मिरजेतील काही राजनिष्ठ व्यापाऱ्यानी जाहीर पत्रके काढून सत्याग्रहास अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. पण त्यास श्री. केशवदासजी शेटजी यांनी शेतकऱ्यांना पाठिंबा देणाऱ्या व्यापाऱ्यातर्फे जाहीरपत्रके काढून व हरताळ पाळून जाहीरपणे आपला विरोध (दरबार धोरणा विरुद्द) प्रकट केला होता. त्यामुळे राजनिष्ठ व्यापारी मंडळीचा सत्याग्रहावरील निषेध हाणून पडला. या सत्याग्रहातील रयतेंना बाहेरील नागरिकांनी अनेक प्रकारचे साहय केले. अनेक मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रानी मिरजेच्या रयत सत्याग्रहाला वाचा फोडली व दरबारच्या धोरणाचा निषेध केला.होता. यानतर दरबारकडून "सर्व रयतेने जागा सोडून निघून जावे असा हुकूम काढला व त्यावेही रयतेची पूर्णपणे पालन केले होते. सत्याग्रहाच्या लढयात

सामील झालेल्या सर्व रयतेतर्फे आम्ही रयत श्रीमंत सरकार यांनी पूर्वी जाहीर केलेल्या आश्वासनाप्रमाणे श्री. पुंडलिकजी बरोबर सारी वाढीची रीतसर चौकशी करा. या वेळी आम्ही आमचे म्हणणे मांडून त्याची दाद मागू परंतु सध्याच्या परिस्थितीत आम्ही सातदिवस सत्याग्रह करून ही आपल्या हृदयास पाझर फुटला नाही उलट आम्हास निघून जाण्याचा हुकूम काढला" आम्ही दु:खी अंत:करणाने जात आहोत. परंतु वाढलेला सारा देण्याचा त्राण आमच्या अंगात नाही व तो आम्ही देणार नाही" असे जाहीर पत्रक सत्याग्रहाच्या शेवटच्या दिवशी काढून रयतेने राजेसाहेबाना कळविले होते.[२१]

## श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांचा चौकशीचा देखावा व पूजेचा नकार

रयतेचा सत्याग्रह संपुष्टात आला म्हणून श्रीमंत युवराज तात्यासाहेबप पटवर्धन ह्यानी सारावाढी चौकशी देखावा दि. २२/११/१९२८ रोजी वड्डी व ढवळी येथे जाऊन सुरु केला होता. त्याच्या बरोबर श्री. रामभाउ पोतनीस हेही होते. वरील दोन्ही गावच्या रयतानी चौकशीचा देखावा "पुंडलीकजी बरोबर ही चौकशी होईल तरच आम्ही आमचे म्हणणे मांडू" असा मनोदय व्यक्त करून, नकार दाखवून उधळून लावला. त्यामुळे चौकशीचे कामकाज श्रीमंत युवराज तात्यासाहे यांनी इतर गावात जाऊन करण्याचे रहित केले.[२२]

## "मुंबईच्या टाईम्स" बातमीदाराला दिलेली मुलाखत

श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांच्या चौकशीला निराशा

पत्करावी लागली म्हणून श्रीमंत सरकार सर बाळासाहेब पटवर्धन यांनी ता. २३/११/१९२८ रोजी मुंबईच्या टाईम्सला मुलाखत देऊन "सारावाढीत सूट मिळणार नाही, लोकोपयोगी करण्याकरिता सुधारणा करण्याकरिता सारावाढ करण्यात येईल. सत्याग्रहाची चळवळ बंद केल्या शिवाय मी काहीही करणार नाही. रयतेचे खरे प्रतिनिधी जे आहेत अशांची मी भेट घेईन व त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेईन." मी प्रजेचा व प्रजा माझी आहे आणि मी त्यांची गाऱ्हाणी दुर करण्याकरिता शक्यतो सर्व प्रयत्न करीन" तसेच मुंबई टाइम्सच्या वार्ताहाराशी खोटी विधाने करुन ते असे म्हणाले की, "चौकशी करेन असे मी बोलली होतो पण कोणतेही वचन दिले नव्हते" असे मत मांडले.

त्यानंतर त्याच बातमीदाराने रयतेचे पुढारी म्हणून श्री. पुंडलीकजी यांची मुलाखत घेतली होती. श्री. पुंडलीकजीनी बातमीदारास मुलाखत देताना म्हणाले की, "श्रीमंतांच्या अभिवचनानुसार चौकशी न केली जाईल तर रयत बहुधा एक पैदेखील सारा देण्यास तयार होणार नाहीत".[२३]

अशारितीने श्रीमंत सरकारच्या मुलाखतीतील विधानाचा शेवट त्यांनी "रयतेने साराबंदी" करण्याचा चळवळीनुसार होईल असा केला.

मिरज संस्थानच्या श्रीमंत सरकार यांनी रयतेच्या सत्याग्रहाची चळवळ हाणून पाडण्याकरीता लोकपक्षीय चळवळीतील श्री. बा.का. जोशी वकील यांना कारभारी पदावर नियुक्त केले व त्यांच्याकडे शेकडा ४०% सारा वाढ वसूलीचे काम देऊन टाकले होते. कारभारी

साहेब श्री. बा.का. जोशी यांना एकंदर १४ गावांना भेटून फेरचौकशी होणार नाही व झालेला तरम कायमच राहणार व तो तरम आकार वसूल केला जाणार असे गावोगावी म्हणून गेले. होते. कारभारीसाहेबांनी ज्या ज्या गावांना भेटी दिल्या होत्या तेथील रयतेनी त्यांच्या आगमनावर बहिष्कार घातला व चळवळ पुढे चालूच ठेवली होती.

परंतु इकडे श्री. बा.का. जोशी हे कारभारी पदावर नियुक्त केले गेल्यामुळे रयतेच्या काही प्रतिनिधींनी त्याची कारकीर्द यशस्वी-पणे होण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यामुळे रयतेच्या सत्या-ग्रहाच्या लढयास फार मोठा धक्का बसला ही गोष्ट मान्य करावीच लागते.

## साराबंदी किंवा करबंदी चळवळ

महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीतील शेवटची पायरी म्हणजे साराबंदी किंवा करबंदीची चळवळ ही होय. या प्रकारची राजकीय चळवळ करण्याचा पुढाकार सर्व प्रथम गुजराथ येथील बार्डो-लीतील शेतकऱ्यानी घेतला व त्यानुसार त्यांनी साराबंदीची चळवळ सरदार वल्लभभाई पटेलच्या नेतृत्वाखाली यशस्वीही केली होती. बार्डोलीच्या साराबंदी लढयानंतर सारावाढी विरुद्ध चार पाच ठिकाणी थोड्याफार प्रमाणात साराबंदी किंवा करबंदी चळवळी झाल्या होत्या त्यापैकीच मिरज संस्थानातील साराबंदीची किंवा करबंदीची चळवळ ही एक होती.

मिरज संस्थानातील करबंदी किंवा साराबंदीच्या चळवळीची पायाभरणी कै. बा.वि. उर्फ तात्या शिखरे यांनी केली होती.

सुरुवातीस सुरु केलेल्या सत्याग्रहाच्या बुडाशी करबंदीचा प्रसंग येऊ नये असे पुढाऱ्यांना वाटत होते. परंतु दरबारने स्वीकारलेल्या प्रतिगामी धोरणामुळे आणि रयतेचे सर्व प्रयत्न सनदशीरमार्गाचे निष्फळ ठरल्यामुळे "साराबंदी" किंवा करबंदीची" चळवळ सुरु करण्याचा दुसरा मार्गच शिल्लक राहिला नव्हता.

श्रीमंत सरकार बाळासाहेब पटवर्धन यांनी रयतेना दिलेले वचन भंग केल्यानंतर त्यांनी एकत्रित येऊन ही चळवळ करण्याचा निर्णय घेतला. रयतेच्या सत्याग्रही पुढाऱ्यांपैकी श्री. पुंडलिकजी कातगडे यांनी मुंबईच्या टाइम्सला ता. २३/११/१९२८ दिलेल्या मुलाखतीमध्ये "करबंदीची चळवळ आपण करणार व ती यशस्वी होणार असल्याचे प्रथम हीर केले. त्यामुळे त्यांनीच साराबंदी किंवा करबंदी चळवळीचा मिरज संस्थानात जाहीरपणे पाया घातला असे म्हणावयास हरकत नाही ते आपल्या मुलाखतीत असे म्हणाले होते की, जर दिलेल्या वचनानुसार सारा चौकशी केली नाही तर रयत एक पैही कर देणार नाही".

हिराबाग वाड्यासमोरील रयतेचा दुसरा सत्याग्रह उठल्यानंतर सत्याग्रहातील श्री. पुंडलीकजी कातगडे आणि इतर रयतेचे प्रतिनिधी ता. २०/११/१९२८ पासून ते ता. १६/१२/१९२८ पर्यंत म्हणजे जवळ-जवळ एक महिनाभर करबंदी चळवळीचा प्रचार स्व खेड्यातून करीत होते. त्याचा परिणाम म्हणून रयतेची मने करबंदी किंवा साराबंदी चळवळीस तयार झाली होती. रयतही शपथा किंवा प्रतिज्ञा करून आपआपली तयारी करीत होते.

त्यामुळे श्रीमंत राजेसाहेब व त्यांचे अधिकारी यांच्या विषयी

रयतेच्या मनात कसलाच नैतिक पाठिंबा शिल्लक राहिला नाही. एवढेच नाही तर अखिल महाराष्ट्रातील श्रीमंताविषयीचा नैतिक पाठिंबा मिळेल अशा परिस्थितीत राहिली नाही. बहुतेक वर्तमानपत्रांनीही श्रीमंताच्या प्रतिगामी धोरणासंबंधी तीव्र स्वरूपाची मते व्यक्त केली होती. करबंदीची चळवळ यशस्वी करण्याकरिता रयतेने ज्या कांही गोष्टी करण्यासंबंधी ता. ९/१२/१९२८ रोजी निर्णय घेतला होता. त्या अशा की, "या सारावाढीच्या कामासाठी शेतकरी वर्गापैकी कोणीही कोणत्याही प्रकारचे लिलावाचे अगर जप्तीचे काम पंच व्हावयाचे किंवा लिलाव मागावयाचे नाहीत" ज्या शेतकऱ्यांचे नुकसान जमिनीसंबंधी होईल त्यास सर्व लोकांनी सर्व प्रकारची मदत करावयाची. रोजगारी किंवा थोडी जमीन असणाऱ्या रयतेनी शेतीचा लिलावाखेरीज इतर कोणताही लिलाव मागू नये किंवा पंच म्हणून पुढे येऊ नये."[२४]

वरील प्रकारच्या निर्णयानुसार मिरज संस्थानातील रयतेने सारा-बंदीची किंवा करबंदीची चळवळ संघटितरीत्या समदशीरपणे चालवली होती. हा रयतेचा लढा अखेरपर्यंत असाच चालू राहिला, तर निश्चितपणे त्याना यश मिळणार होते.

<u>साराबंदी/करबंदी चळवळीस ब्राह्मण वर्गाचा</u>
<u>राजा व प्रजेस आशीर्वाद</u>

रयत लोकांनी जबर व अन्याय्य सारावाढी संबंधी जी चळवळ चालवली आहे त्यास आम्हां ब्राह्मण वर्गाचा आशीर्वाद आहे.

रयत हेच देशाचे आधारस्तंभ आहेत. श्रीमंत व रयतेना आयुरारोग्य देऊन राजा व प्रजेमध्ये पूर्वीप्रमाणे आपुलकीची भावना निर्माण व्हावी अशी आमची इच्छा आहे" असे रयतेला व श्रीमंत राजेसाहेबांना कळविले. अशा रितीने ह्या पत्रकानुसार या वर्गाचाही नैतिक पाठिंबा नाहीसा झाला.

वरीलप्रमाणे एका बाजूस रयतेच्या करबंदी चळवळीस सर्व बाजूंनी पाठिंबा मिळत होता तर दरबारचा पक्ष हा लोकमतापासून बाज बाजूला पडत होता. त्याचा परिणाम म्हणून दरबारच्यावतीने एक जाहीरपत्रक काढून रयतेबरोबर तडजोड करण्याच्या प्रवृतीची पाया भरणी केली होती.

### "जाहीरपत्रक व तडजोडीची तयारी"

प्रजेच्या पुढा-यांनी रयतेनी सारा भरू नये किंवा करबंदी करण्याचे सांगितल्यामुळे "संस्थानचा राज्यकारभार सुयंत्रितपणे चालवून संस्थानात शांतता नांदणे अशक्य झाले आहे व त्यामुळे सरकारास निरूपयाने व मोठ्या कष्टाने शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता कडक उपाय योजणे आवश्यक झाले म्हणून या जाहीरपत्रकाद्वारे असे प्रसिद्ध करण्यात येते की, चळवळी लोकांनी आपली चळवळ ताबडतोब बंद करावी व रयत लोकांनी त्यांचा नाद सोडून योग्य रितीने सरकार मार्फत आपल्या तक्रारींचा निकाल करून घ्यावा. तसे न झाल्यास सरकारास अखेर कडक उपाय योजनेचा अवलंब करावा लागेल.[२५]

दरबारप्रणीत दडपशाही स्वरूपाच्या वरील जाहीरपत्रकाविरुद्ध ज्ञान प्रकाश, मराठा संस्थानी स्वराज्य, संग्राम पत्राद्वारे

संस्थानावर कडक टीका केली.

सरकार तर्फे जाहीरपत्रक प्रसिद्ध होणार ह्यांची कल्पना प्रजा"परिषदेच्या पुढा-यांना माहीत होती. त्यांनी त्याकरिता सर्व खेड्यातून एक दौरा काढून प्रत्येक गावातील पंचाना ता. १३/१२/१९२८ रोजी मिरज येथे करबंदी किंवा साराबंदीच्या चळवळी-ची सिद्धता करण्याकरिता बोलावले होते. याप्रमाणे सर्व गावचे पंच डा. नारायणराव जोशी यांच्या दिवाणखान्यात जमले. तेथे श्री. पुंडलीकजींच्या अध्यक्षतेखाली एक सभा झाली. या सभेत "करबंदी" किंवा साराबंदी जाहीर केल्याशिवाय आपला लढा निर्धाराने अखेरपर्यंत चालूच ठेवण्याचा निर्णय घेतला गेला होता. आपण हा निर्णय घेतला त्यासंबंधी आनंद आहे सरकारी जाहीर पत्रकात रयतेचे पंच भेटण्यास आल्यास तडजोड करण्याचे सरकारचे धोरण आहे तेव्हा आपण पंच निवडून सरकारकडे पाठवून देण्यास काही हरकत नाही असे नंतर पुंडलीकजीनी आपला मनोदय व्यक्त केला. व तिथे या पंचाची तडजोड आपण सर्वांनी मान्य करावी असे ठरविले. होते. तडजोड न करताच करबंदी करण्याचा मार्ग स्वीकारावा लागला तर "सर्व गावानी सारा भरला तरी आमचे गाव सारा भरणार नाही आणि आमच्या गावातील सर्व लोकांनी सारा भरला तरी मी स्वत: भरणार नाही अशा प्रकारच्या तिथे शपथा घेण्यात आल्या होत्या.[२६]

याप्रमाणे तडजोडीकरिता श्री. माधवरावच देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली एक पंच कमिटी पाच सदस्यांची नियुक्त केली. त्यामध्ये

श्री. बा.शा. धुळी, श्री. कृ.रा. कानडे, श्री. बा.बा. पाटील व आत्माराम इंदुराम इंगवले यांचा समावेश होता यापैकी शेवटचे तडजोडीच्या वेळी हजर नसल्यामुळे शिरढोणाचे, श्री. ज्ञानदेव जयराम पाटील यांना पाठवले होते.

वरील पंच मंडळीनी श्रीमंतांना आम्ही जाहीरपत्रकानुसार आमच्या तक्रारीची दाद मागण्याकरिता भेटण्यास येत आहोत असे ता. १८/१२/१९२८ रोजी कळविले होते.

त्यानंतर श्रीमंताकडून ता. १९/१२/१९२८ रोजी पंचाना भेटण्यास परवानगी दिली. जेव्हा पंचमंडळी श्रीमंताना भेटण्यास गेली तेव्हा ते म्हणाले, की आम्ही चळवळीच्या पुढा-याशी संबंध ठेवला ही आमची चूक झाली आतां त्यांच्याशी आम्ही संबंध ठेवणार नाही. असे प्रथम लिहून द्यावे व आम्ही प्रसिध्द करणार तो वाढलेला सारा कायम राहील त्यात सुट मी मला वाटेल त्यानुसार देईन असा निरोप रयतेना कळविला. त्यासंदर्भात आम्ही विचार करून आपल्याला कळवितो असे पंचमंडळीनी दरबार प्रमुख श्रीमंताना कळविले होते. शेवटी स्वत: श्रीमंत, राज्यकारभारी श्री.बा.का. जोशी, श्रीमंत युवराज तात्यासाहेब यांच्यात सारावाढीसंबंधी खालीलप्रमाणे तडजोड झाली.

**श्रीमंतसरकार, श्रीमंत युवराज, तात्यासाहेब व रयतेचे पंचांच्या सारावंदी संदर्भातील तडजोडी:**

श्रीमंत सरकारने व रयतेचे पंचानी खालील गोष्टीबाबत तडजोड केली.

१) औरिजिनल सर्व्हेचे आकारापेक्षा रिव्हिजन सर्व्हेमध्ये जी वाढ झाली आहे त्या वाढीपैकी शेकडा २५ टक्के प्रमाणे माफ करून बाकी वाढ औरिजिनल आकारासह वसूल करावी.

२) चालू सन १३३८ फसली एकसाल रिव्हिजन सर्व्हेमध्ये झालेल्या वाढीपैकीं ३५ टक्के रक्कम वसूल करावी. सन १३३९ फसली सालापासून कलम १ यात ठरल्याप्रमाणें सर्व आकार साल दरसाल मुदती अखेर वसूल करावा.

३) पारस्थळ व मौरस्थळ वगैरेसारख्या ज्या वैयक्तिक तक्रारी असतील त्याबद्दलचा विचार अलाहिदा करण्यात येईल. सदर विचार होईपर्यंत सतक्रारी असलेल्या लोकांपूरताच रिव्हिजन सर्व्हेमध्ये वाढलेला सारा तहकूब ठेवण्यात येईल. व त्यानुसार आकार बंद वगैरे कायदा दुरुस्ती करून वसुलाची तजवीज करण्यात येईल.

४) तक्रारी अर्जांना स्टॅम्प ड्यूटी आकारली जाणार नाही.

५) तक्रारी अर्जांचे निकाल प्रत्यक्ष ठिकाणी तक्रारी ऐकून दिला जाईल.

६) रयतेस आपल्या तक्रारी वकिलामार्फत मांडण्याची परवानगी दिली. सारावाढी संदर्भातील लिहिण्याचा व वकील खर्च सरकार करील.

७) मिरज तालुक्यातील रयतेने सारावाढी विरुद्ध केलेल्या सत्याग्रही चळवळीचा फायदा मोडनिंब व लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतेनांही सारा सूट व इतर सवलती मिळतील.

वरील अटीसमामान्यता देऊन ता.१९/१२/१९२८ रोजी दरबारने एक जाहीर नामा प्रसिद्ध केला होता.[२७]

कोणात्यातरी परिस्थितीनुसार दरबार व पंच कमिटी यांच्यात तडजोड झाली. रयतेना ह्या वाटाघाटी समजून देण्याकरिता परवानगी दरबारकडून मागितली त्यास दरबार अधिका-यानी नकार दिला. परंतु परवानगीची फिकीर न करता त्यांनी छोडो दौरा काढून रयतेना तडजोड स्वीकारण्यास सांगितले. तडजोडीनुसार जरी रयतेच्या अनेक तक्रारी असल्या तरी त्या वैयक्तिक रित्या त्याची दखल घेतली जाणार होती. वैयक्तिकरित्या म्हणणे रयतेने आपल्या तक्रारी नोंदविल्या होत्या. परंतु दरबारने त्या तक्रारींची दिरंगाईवाट लावली या संदर्भात पंच मंडळीनीही तक्रार स्टेट कारभारी श्री. बा.का. जोशी यांच्याकडे केली होती. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. दरबारच्या अधिका-यानी अरेरावीचे धोरण स्वीकारले आणि वरील तडजोडीप्रमाणे सारा वसूली करण्यास सुरुवात केली होती. अशा रितीने रयतेच्या वैयक्तिक तक्रारीची दरबारकडून दखल घेतली नाही. परंतु रयतेला सुवर्णमय साराबंदीच्या चळवळीनुसार श्रीमंत सरकारच्या "मी प्रजेचा व प्रजा माझी" या धोरणाचा चांगलाच अनुभव प्रत्यक्षपणे पहावयास मिळाला होता.

श्रीमंत सरकारच्या एकतंत्री राजसत्तेच्या विरुद्ध जबर आणि अन्याय सारावाढ संदर्भात जो तीव्रपणे लढा दिला होता त्यामुळे या लढयाला महत्त्वाची प्रतिष्ठा मिळाली व शेवटी काही का प्रमाणात होईना सारावाढ कमी करावयास भाग पाडले. हा रयतेचा सारा वाढ संबंधीचा लढा, हा दक्षिण महाराष्ट्रातील सारावाढ चळवळीच्या

इतिहासात "छोटया बार्डोलीतील रयतेचा यशस्वी लढा" म्हणून अविस्मरणीय ठरेल.

## लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतेची सारावाढ चळवळ

१९२८ साली मिरज तालुक्यातील रयतेनी संघटितपणे प्रभावी चळवळ करुन सारा वाढ कमी करुन घेतली होती. त्यावेळी लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतेची स्थिती हलाखीची असतानाही जबर पणे श्रीमंता- अगोदरच इतर दोन तालुक्यापेक्षा या लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतेवर असाहय सारा वाढ झाली म्हणून गेल्या ४0 वर्षापासून ती कमी करण्याकरिता ओरड चालु होती. परंतु त्यात लक्ष्मेश्वर तालुक्याची आर्थिक परिस्थिती खालावलेली असतांना १९२८ सालच्या नवीन सारा- वाढीने भर घातली होती.

त्यात पुन्हा धान्य स्वस्ताई निर्माण झाली. त्याचा परिणाम रयतेवर आर्थिक परिस्थितीवर झाला. वरील परिस्थितीमध्ये बदल करण्याकरिता ता. १0 सप्टेंबर १९३२ रोजी दरबारकडे सारावाढीची फेरचौकशी व रयतांची आर्थिक स्थिती सुधारणेकरिता इतर उपाय योजना करावी म्हणून मागणी केली होती. परंतु दरबारने याचा कांहीही विचार केला नाही.[२८]

सन १९३८ सालामध्ये लक्ष्मेश्वर तालुक्यात पाऊस अजिबात पडला नाही. अवर्षण पडले. दुष्काळ पडला पण सरकारच्यावतीने सारा वसूली चालूच होती. प्रजेचे सारावाढ कमी करण्याबाबत अनेकवेळा अर्ज-विनंत्या केल्या परंतु दरबारने त्यांची दखल घेतली नाही. रयतेची स्थिती आता पूर्वी सारख्या १९२८ सालासारखी राहिली

नव्हती. पूर्वीच्या सारावाढ चळवळीनुसार रयतेमध्ये व संघटितपणाची व जागृतीची जाणीव झाली होती. त्यामुळे दरबार पुढे लक्ष्मेश्वर रयतेनी करबंदीचा निर्णय जाहीर केला होता. दरबारकडून यावेळीही करबंदीची चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न चालू केला होता.

दक्षिण संस्थान लोकपरिषदेचे बारावे अधिवेशन ता. २२ व २३ मे, १९३८ रोजी सांगली येथे श्री. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. हया परिषदेमार्फत "लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतांची सारा न देण्याची स्थिती लक्षांत घेऊन श्री. श्रीमंत राजेसाहेबांनी लोकांची मागणी मान्य करावी व साऱ्याची सूट द्यावी असा ठराव मंजूर केला होता. लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतेची चौकशी करण्याकरिता द.भ. श्री. गंगाधरराव देशपांडे, श्री. दे.भ. शंकरराव देव, दे.भ. पुंडलीकजी कातगडे, श्री. आर्.एस्. हुकेरीकर, श्री. हणमंतराव गाडगोळी वकील व श्री.गो.ल. कणाबूरकर वकील यांची एक लक्ष्मेश्वर चौकशी कमिटी नियुक्त केली होती.[२९]

या चौकशी कमिटीने लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतेची प्रत्यक्षपणे पाहणी केली, रयतेच्या तक्रारी ऐकून घेतल्या. याप्रमाणे कामकाज चौकशी कमिटीने आपले काम ता. २२/६/१९३८ रोजी केले होते. दुसरे दिवशी दि. २३ जून १९३८ रोजी लक्ष्मेश्वरचे माम्लेदार साहेब यांना भेटण्यास गेले होते. त्यांनी सरकारतर्फे आवश्यक ती माहिती कमिटीस दिली. यानतर चौकशी कमिटीने श्री. देसाई वाड्यात सुरु केले होते. चौकशी कमिटीशी विचारविनिमय करण्याकरिता श्री. कोप्पर वकील, श्री. शंकरगौंडा पाटील, श्री. नागराजप्पा धोंगडी, श्री.दुलजूर श्री.जगणावार व श्री. कुमैसीची रयतेतर्फे एक कमिटीची निवड केली होती.

लक्ष्मेश्वर चौकशी कमिटी पुढे रयतेच्या कमिटीच्या वतीने श्री. कोप्पर वकीलाच्यामार्फत मागणीचा एक अर्ज सादर केला होता. या अर्जामध्ये सारा हा खालसा मुलुखाप्रमाणे घ्यावा, सा-यामध्ये भरपूर सूट द्यावी, थकलेल्या सा-यामध्ये संपूर्ण सूट द्यावी अशी मागणी केली होती.

यानंतर लक्ष्मेश्वर कमिटीने श्री. वामनराव देसाई (बेळगाव) श्री. देशपांडे श्रीदेव यांच्या मध्यस्थीने मिरज दरबारपुढे मांडल्या. व त्यानंतर कमिटी व दरबार यांच्यात वाटाघाटी सुरू झाल्या. मिरजेचे दिवाण रा.बा.का. जोशी व श्री. भास्करराव मराठे वकील यांनी कमिटीपुढे दरबारचे धोरण स्पष्ट केले. लक्ष्मेश्वर चौकशी कमिटीच्या अहवालासंबंधी सल्लागारांचा सल्ला घेऊन नंतर लक्ष्मेश्वर रयतेच्या तक्रारींचा मसुदा शुक्रवारी ता. २४ जून १९३८ रोजी श्रीमंत दिवाणसाहेब, श्री.वामनराव देसाई, श्री.गंगाधरराव देशपांडे, श्री. शंकरराव देव यांनी सादर केला. या मसुद्यास श्रीमंत राजेसाहेबांनी ताबडतोब संमती दिली. अशा रितीने या लक्ष्मेश्वर रयतेच्या करबंदी चळवळीचा न्यायपूर्ण शेवट झाला.[३0]

या चळवळीच्या यशानंतर श्री. पुंडलिकजी कातगडे म्हणाले की, १९२८ साली मिरज तालुक्यात झालेल्या चळवळीचा हा दुसरा भाग आहे. यापूर्वी अशी चळवळ करण्याचा प्रयत्न प्रथम मिरज तालुक्याने केला व त्यास मोडनिंब आणि लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतेने पाठिंबा दिला होता. यावेळी लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतेने पुढाकार घेऊन इतर दोन तालुक्यांनी त्यास पाठिंबा दिला आहे. त्यामुळे एका तालुक्यातील केलेल्या चळवळीचा फायदा हा इतर तालुक्यानांही झाला हे विसरता येणार नाही.

श्रीमंत राजेसाहेब बाळासाहेब पटवर्धन यांनी दरबारतर्फे ता. १२ जुले १९३८ रोजी एक जाहीरनामा प्रसिद्धीस देऊन सर्व रयतेना तडजोडीमध्ये कोणात्या गोष्टी निश्चितपणे ठरल्या ते जाहीर केले. त्याचे स्वरूप खालीलप्रमाणे होते.

१) लक्ष्मेश्वर तालुक्यात गेल्या सात ते आठ वर्षापासून पावसाच्या अनियमितपणामुळे पिके चांगली आली नाहीत हे लक्षात घेऊन सन १३४५ फसली अखेरची सर्व शेतक-यांची बाकी व जुडीची बाकी सूट देण्यात आली आहे.

२) लक्ष्मेश्वर तालुक्यांची सन १३४६/४७ फसली सालची शेतक--यांच्या शेतसा-याची व जुडीची बाकी सन १३४८ फासली सालचे ज्या त्या गावच्या त्या-त्या हप्त्यापर्यंत वसूल करण्याची तहकुबी देण्यात आली आहे.

३) लक्ष्मेश्वर तालुक्याची परिस्थिती लक्षात घेऊन चालू सन १३४८ फसली सालापासून हल्ली वसुली करण्यांत येत असलेल्या शेतसा-यापैकी शेकडा २० टक्के सूट देण्यात येत आहे.

जरी लक्ष्मेश्वर तालुक्यातील रयतांचे अर्जावरून वरील प्रकारच्या सवलती देण्याचे ठरले असले तरी मिरज व मोडनिंब तालुक्यातील प्रजा ही आमच्या डोळ्यापुढे असून त्यांचाही विचार करणे आमचा धर्म समजून आम्ही खालीलप्रमाणे करण्याचे ठरविले आहे.

१) मिरज व मोडनिंब तालुक्यांची फसली सन १३४५ अखेरची शेतसा-याची व जुडीची बाकी सूट देण्यात आली आहे.

२)चालू सन १३४८ फसली सालापासून मिरज व मोडनिंब तालुक्यांत हल्ली वसूल करण्यांत येत असलेल्या शेतसा-या पैकी शेकडा २० टक्के सूट देण्यात येत आहे.

३) मिरज तालुक्यातील तानंग, बोलवाड, शिरढोण या गांवची रिव्हिजन सर्व्हेने जी वाढ झाली ती बरीच जास्त असल्याने व त्याप्रमाणे त्या गावचे लोक आजतागायत सारा देत असल्यामुळे यापुढे त्या गावचे लोकांकडून वाढीचे रकमेपैकी सरसकट २५ टक्के शेतसारा वसूल करून बाकीची सूट देण्यात आली आहे.

मालगांव येथील बधारे एक, तीन व सहा या पाटास पाणी येत नाही, सबब त्यावरील पाटस्थळ आकार कमी करण्यात येईल. सदरहू जमिनीवरील पाण्याचा आकारही बाकीसह कमी करण्यात येत आहे. परंतु यापुढे पाटाचे पाणी कोणी घेतल्यास त्यांच्याकडून लक्ष्याच्या कायद्यान्वये व नियमाने सारा-वसुली केली जाईल.

याशिवाय आवश्यक त्या सुधारणा पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आल्या.

१) मिरज संस्थानातील "सभाबंदी" कायदा रद्द केला.

२) मिरज संस्थानातील "परस्थांचा"कायदा रद्द केला.

३) मालगांव, कवठेपिरान, लक्ष्मेश्वर, शिगली, मोडनिंब येथील म्युन्सिपालिटयातील अध्यक्ष हा पुढील निवडणुकीपासून लोक-नियुक्त व म्युन्सिपालिटयामध्ये लोकनियुक्त सभासदांचे बहुमत राहील.

४) मिरज संस्थानात लोकल बोर्डाची स्थापना करण्यात येईल.

५) लक्ष्मेश्वर तालुक्यांतील विणकऱ्यांची स्थिती सुधारणे-
करिता कांही मागण्या केल्यास त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार
करण्यात येईल.

६) लक्ष्मेश्वर तालुक्यांतील कानडी भाषेला मान्यता दिली.

७) मिरज संस्थानामध्ये जबाबदार राज्यपध्दती अंमलात आणणेचें
ध्येय दरबारास मान्य आहे.[३१]

मिरज संस्थानातील साराबंदी चळवळीस "छोटी बार्डोली"ची चळवळ समजण्यात येते. याचे कारण असे की रयतेने आपल्या संघटित सामर्थ्याच्या जोरावर एकतंत्री राजेशाहीस आव्हान दिले आणि सरकारकडून अनेक मागण्या मान्य करून घेतल्या. साराबंदीची चळवळ ही प्रजापरिषदेच्या लोकशाही हक्क मिळविण्याच्या चळवळीचाच एक भाग होता. कारण चळवळीचा मुख्य उद्देश संस्थानात प्रजासत्ताक राज्य स्थापन करणे हा होता.

त्याचप्रमाणे कांही प्रमाणात लोकांस अधिकार दिलेले कायदे-मंडळ १९३१ साली संस्थानात स्थापन झाले. या कायदेमंडळास प्रजेस जास्तीत जास्त प्रमाणात प्रतिनिधित्व मिळण्यासाठी म्हणजेच राज्य-व्यवस्था जनतेस जाबाबदार करण्यासाठी प्रजेने सतत संघर्ष केला. पण या कायदेमंडळाकडून स्वातंत्र्योत्तर काळात आपले प्रश्न सुटत नाहीत, उलट स्वतंत्र लोकसत्ताक भारतातच आपणास खऱ्या अर्थाने लोकशाही अधिकार मिळतात हे प्रजेच्या लक्षात आल्यानंतर जनतेने संस्थानच्या विलिनीकरणाची म्हणजेच सरंजामशाहीस पूर्णत: नष्ट करण्याची

चळवळ सुरु केली. पुढील दोन प्रकरणात कायदेमंडळाचे स्वरुप व कार्य आणि संस्थानच्या विलिनीकरणाची चळवळ यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

.....

# संदर्भ सूची

## प्रकरण तिसरे

### "मिरज संस्थानातील सारावंदीची चळवळ"


१. दैनिक, ज्ञान प्रकाश, पुणे, ता. ५ सप्टेंबर १९२८.

२. मिरज संस्थान प्रजा-परिषदेचे तिसरे अधिवेशन, त्रोटक अहवाल, आर्यभूषण प्रेस, पुणे, १९२७, पान नं.५.

३. श्री. शिखरे, बा.वि., संस्थानी स्वराज्य, साप्ताहिक, पुणे, लेखमाला "मिरज संस्थानातील सारावाढ", ता. ८ आक्टोंबर १९२७.

४. स्पष्ट वक्ता, "मिरज संस्थानातील सारावाढ आणि रयतेवा सत्याग्रह", आर्यभूषण प्रेस, पुणे, १९२९, पान नं. ३ ते ९.

५. मिरज संस्थान प्रजा-परिषदेचे दुसरे अधिवेशन, त्रोटक अहवाल, आर्यभूषण प्रेस, पुणे, १९२७, पान नं. १७.

६. श्री. शिखरे, बा.वि., संस्थानी स्वराज्य, साप्ताहिक, पुणे, लेखमाला "मिरज संस्थानातील सारावाढ" ता.१३ आगस्ट १९२७.

७. स्पष्ट वक्ता, उपरोल्लिखित, पान नं. ४.

८· स्पष्ट वक्ता, उपरोल्लिखित, पान नं· २१ ते २४·

९· मिरज संस्थान स्टेट गझीट, ता· १८ डिसेंबर १९२८·

१०· संस्थानी स्वराज्य, साप्ताहिक, पुणे, ता· २९ जून १९२८·

११· स्पष्ट वक्ता, उपरोल्लिखित, पान·नं· २६·

१२· स्पष्ट वक्ता, उपरोल्लिखित, पान नं· २७·

१३· मिरज संस्थान प्रजा-परिषदेचे चौथे अधिवेशन, त्रोटक अहवाल, आयुर्भूषण प्रेस, पुणे, १९२८, पान नं· ९·

१४· दैनिक, "मराठा", पुणे, ता· १६ सप्टेंबर १९२८·

१५· स्पष्ट वक्ता, उपरोल्लिखित, पान नं· ३६·

१६· स्पष्ट वक्ता, उपरोल्लिखित, पान नं· ३६·

१७· संस्थानी स्वराज्य, साप्ताहिक, पुणे, ता·९ नोव्हेंबर १९२८·

१८. संस्थानी स्वराज्य, साप्ताहिक, पुणे, ता. ९ नोव्हेंबर १९२८.

१९. स्पष्ट वक्ता, उपरोल्लिखित, पान नं. ७२.

२०. स्पष्ट वक्ता, उपरोल्लिखित, पान नं. ७५.

२१. श्री. पटवर्धन, वि.अ., "संस्थानातील लोकशाहीचा लढा",
संस्थान स्वराज्य कचेरी, पुणे २, १९४०, पान नं. ६९.

२२. स्पष्ट वक्ता, उपरोल्लिखित, पान नं. १२६.

२३. उक्त, पान नं. १४१.

२४. दैनिक, ज्ञानप्रकाश, पुणे, ता. १५ डिसेंबर १९२८.

२५. मिरज स्टेट जाहीरनामा पत्रक, ता. ११ डिसेंबर १९२८.

२६. स्पष्ट वक्ता, उपरोल्लिखित, पान नं. १८०.

२७. मिरज स्टेट गॅझीट, जाहीरनामा, ता. १९ डिसेंबर १९२८.

२८. दक्षिण महाराष्ट्र, साप्ताहिक, सांगली, ता. १२ सप्टेंबर १९३२.

२९. श्री. पटवर्धन, वि.अ., <u>उपरोल्लिखित</u>, पान नं. ७५ ते ७६.

३०. संस्थानी स्वराज्य, साप्ताहिक, पुणे, ता. ११ जुलै १९३८.

३१. मिरज स्टेट <u>जाहीरनामा</u>, ता. १८ जुलै १९३८.

......